|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**संलग्नता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/५/ नवीन महा.प्रस्ताव-२०२१.२२/संकेतस्थळावर/२०२० दि. २४/१२/२०२०

**महत्वाचे** *(संकेतस्थळावर)*

**प्रति,**

**नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी इच्छुक असलेल्या विविध शैक्षणिक संस्थाचे मा.अध्यक्ष/संचालक मंडळ आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/ मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा.संचालक यांना ..**

**विषय :-** सन २०२१-२२ करीता MAHED ने मंजूर केलेल्या बृहत आराखडयातील बिंदूच्या गावाच्या नावातील दुरुस्तीबाबत..

**संदर्भ :-** ०१) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र जा.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.४१/विशि-५ दि. १७ डिसेंबर, २०२०

०२) परिपत्रक जा.क्र. जा.क्र.कबचौउमवि/५/संलग्नीत महा.प्रस्ताव-२०२१.२२ /३३७/२०२० दि. २२/१२/२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग (MAHED) यांनी सन २०२१-२२ करीता नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासाठी बिंदू निश्चित करुन सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाचा बृहत आराखडा मंजूर केलेला असून, सदर मंजूर बृहत आराखडयात काही गावांच्या नावात मुद्रणदोष आढळून आलेले आहेत. तरी सदर बिंदूच्या गावांचे अचूक नाव खालीलप्रमाणे वाचावे.

| अ.क्र. | बृहत आराखडयातील जिल्हा व अ.क्र. | मुद्रण दोष असलेले बिंदूचे (गावाचे) चुकीचे नाव | दुरुस्ती केलेले बिंदूचे (गावाचे) अचूक नाव |
|---|---|---|---|
| ०१ | धुळे जिल्हा अ.क्र.३८ | Vorkhund | Borkund |
| ०२ | धुळे जिल्हा अ.क्र.४३ | Vamhne | Bamhane |
| ०३ | नंदूरबार जिल्हा अ.क्र.४७ | Khandvara | Khandbara |
| ०४ | नंदूरबार जिल्हा अ.क्र.५३ | Vorad | Borad |

तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता शासनाने,

०१) बांभोरी (बु.) ता.धरणगाव ०२) घोडगाव ता.चोपडा ०३) जळगाव शहर (रात्रकालीन) या संस्थांना अंतिम मंजूरी मिळणेकरीता शासनाने इरादापत्र मंजूर केलेले आहे. तथापि, शासनाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता दि. १७ डिसेंबर २०२० रोजीच्या पत्रान्वये सोबत जोडलेल्या मंजूर बृहत आराखडयात वरील स्थानांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता शासनाने बोरकूंड जि.धुळे या संस्थेस इरादापत्र मंजूर केलेले होते. परंतु शासनाने मंजूर केलेले सदर संस्थेचे इरादापत्र आजमितीस कालबाहय झालेले आहे.

***तसेच माहेडने मंजूर केलेल्या सन २०२१-२२ या बृहत आराखडयात * असे चिन्ह दर्शविलेल्या स्थानांकरीता स्वतंत्र प्राधिकरणे असून, त्यांच्या मान्यतेच्या अधिन राहून स्थळ बिंदू निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे अभियांत्रिकी, वास्तुविशारद (Architecture) बी.पीएड./ एम.पीएड./औषधीनिर्माण/बी.व्होक./समाजकार्य या अभ्यासक्रमांचे नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासाठी AICTE/Council of Architecture/Council of Pharmacy/ NCTE / महाराष्ट्र शासन समाजकल्याण विभाग या प्राधिकरणांची स्वतंत्र मान्यता घेणे बंधनकारक आहे.***

**(विशेष सूचना :-** नवीन महाविद्यालये/परिसंस्था सन २०२१-२२ पासून सुरु करण्यासाठी इच्छूक असणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी प्रस्ताव सादर करण्यासाठी विहीत केलेले शुल्क विद्यापीठात नमूद कालावधीत जमा करण्यासाठी संस्थेचे प्रतिनिधी यांना प्रत्यक्ष विद्यापीठात पाठविणे आवश्यक आहे. मात्र, विस्तारांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्थांचे प्रतिनिधी यांनी विहीत केलेले शुल्क विद्यापीठास प्रस्ताव सादर करतेवेळी जमा करावे.)

तरी उपरोक्त प्रमाणे नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**Sd/-**

सहा.कुलसचिव

(संलग्नता विभाग)